दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणात महाराष्ट्र शासनाच्या योजनाचे योगदान एक समाजशास्त्रीय विश्लेषण - विशेष संदर्भ मराठवाडा विभाग

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड सामाजिकशास्त्रे
विद्याशाखे अंतर्गत समाजशास्त्र विषयात
विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी
सादर करावयाचा शोधप्रबंधाचा
प्रथम आराखडा

संशोधक
कु. कवडे बेबी माधवराव
बी.एड., एम.ए. सेट (समाजशास्त्र)
सामजिकशास्त्रे संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक
डॉ. शेंडे के.सी.
सहयोगी प्राध्यापक
समाजशास्त्र विभाग
पीपल्स कॉलेज, नांदेड

संशोधन केंद्र
सामाजिकशास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सन २०१९

दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणात महाराष्ट्र शासनाच्या योजनाचे योगदान एक समाजशास्त्रीय विश्लेषण - विशेष संदर्भ मराठवाडा विभाग

प्रस्तावना :

मनुष्याच्या हाताची पाचही बोटे सारखी नसतात. त्याचप्रमाणे या पृथ्वीवर जन्माला आलेली प्रत्येक व्यक्ती ही सुद्धा एक सारखी नसते. त्यांच्यामध्येही शारीरिक, मानसिक, बौद्धिकदृष्ट्या फरक असलेला दिसून येतो. हा फरक किंवा ही भिन्नता ज्या व्यक्तीमध्ये दिसून येते आपण त्याला सर्वसाधारणपणे दिव्यांग म्हणतो. दिव्यांग व्यक्ती ही जन्मतः किंवा एखाद्या आजाराने किंवा अपघाताने दिव्यांग झालेली असते. दिव्यांग व्यक्ती ह्या प्रामुख्याने दोन प्रकारच्या असतात त्यामध्ये शारीरिक आणि मानसिक असणाऱ्या दिव्यांग व्यक्तीचा समावेश होतो.

दिव्यांग व्यक्तीसाठी सर्वसाधारणपणे विकलांग, अक्षमता असणारे, असमर्थता असणारे असे अनेक शब्द वापरले जातात. सर्वसाधारणपणे दिव्यांग व्यक्ती म्हणजे ज्यांची शरीरिक आणि मानसिक कमतरता अथवा अक्षमता ही ४०% पेक्षा कमी नाही असे अक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र देऊन निर्देशित केले आहे अशी व्यकती दिव्यांग व्यक्ती समजली जाते.

दिव्यांग व्यक्ती हा समाजातील सर्वात मोठा अल्पसंख्याक समुह आहे. तसेच इतर समुहाच्या तुलनेत हा अत्यंत कमकुववत असा वर्ग असून दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणाचा विचार शासनाने करून त्यांच्यासाठी अनेक योजना राबविलेल्या आहेत. दिव्यांग व्यक्तीना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वप्रथम १९९५ चा दिव्यांग कायदा करण्यात आला. आज दिव्यांग व्यक्तीना ज्या काही सोयी सुविधा, योजना मिळतात ते या कायद्याच्या आधारावरच मिळतात. हा कायदा दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणाचा पाया मानला तरी वावगे ठरणार नाही.

दिव्यांग व्यक्तींना समाजात स्वतंत्र व स्वावलंबी जीवन जगण्यासाठी समाजात योग्य स्थान मिळविण्यासाठी शासनाने त्यांच्यासाठी योजना राबविणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत राबविलेल्या योजनाचा फायदा योग्य प्रकारे दिव्यांग व्यक्तींना होत नाही. म्हणून परिस्थिती आणखी बिकट होत आहे. त्यासाठी दिव्यांग व्यक्ती संबंधी असणाऱ्या समस्या, योजना, मानवी अधिकार यावर संशोधन होणे गरजेचे ठरते. कारण दिव्यांग व्यक्ती हा सुद्धा याच समाजाचा घटक आहे.

पूर्वीचा इतिहास बघता दिव्यांग व्यक्तीचे सक्षमीकरण होणे अत्यंत आवश्यक होते. परंतु पुरेशा सोयी सुविधा नसणे आणि योग्य वातावरणाचा अभाव तसेच समाजाशी संबंध येऊन कोणत्याही प्रकारच्या नैसर्गिक आंतरक्रिया घडण्यास वाव मिळत नव्हता. विशेष गरजा असलेल्या या व्यक्तींना दुर्लक्षित घटक म्हणून समाज पाहू लागला. त्यामुळे दिव्यांग व्यक्तींना सामाजिक सुरक्षा मिळू शकली नाही व समाजाच्या नकारात्मक दृष्टिकोनामुळे त्यांच्यावर असमर्थपणाचा ठपका चिकटला आहे. या सर्व कारणांमुळे समाजामध्ये असणाऱ्या दिव्यांग व्यक्तीबद्दल असलेला नकारात्मक दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्तीसुद्धा समाजाचा एक घटक आहे. त्यांना आपण व्यक्ती म्हणूनच बघायला पाहिजे त्यांना इतर सर्व सामान्य माणसाप्रमाणेच भावना आहेत. जे अधिकार सर्वसामान्य व्यक्तीला आहेत तेच सर्व अधिकार दिव्यांग व्यक्तीनाही आहेत.

संयुक्त राष्ट्र संघाच्या अंदाजानुसार जगात जवळपास ५०० दशलक्ष लोक दिव्यांग आहेत. दरवर्षी ही संख्या वाढत आहे. कारण युद्ध विध्वसंक घटना अपघात, अयोग्य राहणीमान दिव्यांगत्वाबद्दल असणारे अज्ञान यामुळे ही संख्या वाढत आहे. विकसनशील देशात विकसित देशापेक्षा दिव्यांग व्यक्तीची संख्या अधिक आहे. UNDP च्या अहवालानुसार जवळपास ८०% दिव्यांग व्यक्ती ह्या विकसनशील देशात आहेत. अशा देशात आरोग्याच्या सोयी, सुविधा उपलब्ध नसल्याने ही संख्या या देशात अधिक आहे असे असले तरी दिव्यांग व्यक्तीच्या समस्येकडे सर्वांचे लक्ष वेधण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने सर्वप्रथम १९८३ साल हे जागतिक दिव्यांग वर्ष म्हणून घोषित केले होते.

तसेच ३ डिसेंबर हा दिवस जागतिक दिव्यांग दिवस म्हणून साजरा केला जातो. जागतिक आरोगय संघटना आणि संयुक्त राष्ट्र संघटनेचा आंतरराष्ट्रीय बाल कल्याण निधी (युनिसेफ) या दोन्ही संघटनानी दिव्यांगाच्या उपचारात्मक प्रतिबंधात्मक व पुनर्वसनाच्या समस्यांना प्राधान्य दिले.

भारतीय राज्यघटनेने समानतेचे तत्व स्वीकारून प्रत्येक नागरीकाला समान हक्क बहाल केले आहेत. असे असले तरी ही समाजातील दिव्यांग असणाऱ्या वर्गांना आपली प्रगती करण्यासाठी अनेक अडचणीला समोरे जावे लागते. समान संधी, समानतेचे तत्व राज्यघटनेने दिव्यांग व्यक्ती (समान संधी हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ लागू केला. असा कायदा करूनही दिव्यांग व्यक्तींना उपेक्षित जीवन जगावे लागत आहे. याचाच अर्थ हया सर्व घटकांना समानतेच्या तत्वाचा लाभ मिळालेला नाही या घटकांना राज्यघटनेनुसार लाभ मिळावा यासाठी सकारात्मक विचार सर्वार्थाने केला नाही. त्यांच्यासाठी तयार करण्यात आलेल्या योजना त्यांच्यावर उपकार करित असल्यासारख्या राबविल्या जात असल्यामुळे केवळ आकडेवारी जमा करण्याच्या अटीमुळे खऱ्या दिव्यांग व्यक्तीना या योजनेचा लाभ घेता येत नाही किंती व्यक्ती या योजनेचा लाभ घेतात याचा प्रत्यक्षात आढावा 'दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणात महाराष्ट्र शासनाच्या योजनाचे योगदान' या संशोधन विषयात घ्यावयाचा आहे.

दिव्यांग व्यक्तींना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वप्रथम १९९५ चा कायदा (समान संधी हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) आत्मसात आणला आणि दिव्यांग व्यक्तींना सक्षमीकरणाची संधी उपलब्ध करून दिली. कालातरांने या कायद्यात बदल करून २०१६ चा दिव्यांग जन हक्क कायदा करण्यात आला आहे. हा कायदा करून त्यामध्ये २१ प्रकारच्या दिव्यांग व्यक्तीचा समावेश केला त्याच बरोबर अपंग किंवा विकलांग हा शब्दपयोग न करता दिव्यांग हा शब्द वापरात आणला. याच कायद्यानुसार समानेतचा अधिकार, भेदभाव रहीत सामुदायिक जीवन जगण्याचा अधिकार, न्यायासह शिक्षण व रोजगार मिळविण्याच्या अधिकाराची हमी मिळवून दिली आहे. तसेच या कायद्याअंतर्गत दिव्यांग कल्याणार्थ अनेक योजना राबविल्या जातात. यामध्ये दिव्यांग व्यक्तींना ओळखपत्र व एस.टी. रेल्वे भाडयात

सवलत, दिव्यांग कल्याण पुरस्कार, आरक्षण व राखीव जागा, एकात्कि शिक्षण योजना अशा अनेक योजनाची शासनाकडून योग्य प्रकारे अंमलबजावणी झाल्यास दिव्यांग व्यक्तीना या योजनेचा लाभ घेता येऊ शकतो. पंरतु वास्तविक पाहता या योजनेचा लाभ घेता येऊ शकतो. पंरतु वास्तविक पाहता या योजनाचा लाभ दिव्यांग व्यक्तींना तेवढया प्रमाणात होत नसल्याचे दिसून येते. यांची पूर्तता होण्यास अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यासाठी संशोधिकेने संशोधनाचा विषय 'दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणात महाराष्ट्र शासनाच्या योजनाचे योगदान' एक समाजशास्त्रीय विश्लेषण हा विषय निवडला आहे.

संभाव्य संकल्पना :

संशोधनाचा विषय निश्चित झाल्यावर त्यामध्ये समाविष्ट होणाऱ्या सर्व संज्ञाची व संकल्पनाची यादी तयार करावी लागते. म्हणून प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने दिव्यांग व्यक्ती या संदर्भात असणाऱ्या समस्या, प्रकार, योजना, सक्षमीकरणाची आवश्यकता, योजनाचे महत्त्व इत्यादी संकल्पनाचा आवश्यकतेनुसार अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधन साहित्याचे सिंहावलोकन :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने संबंधित साहित्याचा आढावा घेतला असता प्रादेशिक व राष्ट्रीय स्तरावर विविध समाजशास्त्रज्ञानी दिव्यांगाच्या समस्याचा, दिव्यांग व्यक्तीच्या मानवी अधिकाराचा, दिव्यांग व्यक्तीसाठी राबविलेल्या योजनांचा सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे. दिव्यांग सक्षमीकरणाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास झालेला असून त्यांचा आधार मी माझ्या संशोधन कार्यात घेणार आहे. त्याचप्रमाणे अध्ययन पद्धती आणि तथ्य संकल्पनाचे तंत्र त्यातून निघालेले निष्कर्ष इत्यादी बाबींचा अभ्यास करून मी माझ्या संशोधनामध्ये योग्य त्या ठिकाणी या संशोधन साहित्याचा आधार घेणार आहे.

संशोधन पद्धती :

संशोधन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. कोणतेही शास्त्र विकसित होत असते ते त्यामध्ये होत असलेल्या सततच्या संशोधनामुळेच. विकास घडवून आणण्यासाठी ज्याप्रमाणे

संशोधनाची आवश्यकता आहे त्याचप्रमाणे भूतकाळातील व ऐतिहासिक घडामोडी जाणून घेण्यासाठी देखील संशोधनाची आवश्यकता असते. मानवी समाजाचे वस्तुनिष्ठपणे अध्ययन करणे हा समाजशास्त्रीय संशोधनाचा उद्देश आहे. मानवी समाजातील सामाजिक संबंधाचे अध्ययन करण्यासाठी सामाजिक संशोधन पद्धतीचा विकास करण्यात आला आहे. पॉलिंग यंग यांच्या मते, सामाजिक संशोधन एक शास्त्रीय पद्धती असुन जिचा उद्देश तार्कीक आणि क्रमबद्ध या पद्धतीद्वारा नवीन तथ्याचा शोध घेणे किंवा जुन्या तथ्यांचे पूनर्परिक्षण करणे व त्यांच्यात आढळून येणारे अनुक्रम अंत:संबंधी कार्यकारणभाव आणि त्यांना संचलित करणाऱ्या नैसर्गिक नियमांचे विश्लेषण करणे हा आहे.

वरिल व्याख्येवरून हे स्पष्ट होते की, सामाजिक संशोधन ही मानवाच्या सामाजिक जीवनाच्या विविध पैलूचे अध्ययन करणारी वैज्ञानिक पद्धती आहे. सामाजिक संशोधनातून ज्ञान प्राप्त होते. तसेच जून्या ज्ञानाचे परिक्षण होते. नवीन ज्ञान प्राप्त होऊन सामाजिक वास्तवतेविषयीचे ज्ञान विकसित होत जाते. घटनेतील कार्यकारण संबंध माहिती झाल्यामुळे कारणाचा शोध घेऊन त्यावर नियंत्रण प्रस्थापित करून कार्याला हवे तसे घडवून आणता येते मानवाला व मानवी समाजाला संशोधनाच्या माध्यमातून उपयुकत गोष्टीची निर्मिती करता येते. आधुनिक समाजात किंवा जगात नवीन ज्ञान प्राप्तीसाठी संशोधनाशिवाय पर्याय उपलब्ध नाही. यावरून संशोधनाचे महत्त्व लक्षात येते. म्हणून दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणात महाराष्ट्र शासनाच्या योजनाचे योगदान' एक समाशास्त्रीय विश्लेषण या प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन आराखडा :

मानवी जीवनातील कोणतेही कार्य सुव्यवस्थित पार पाडण्यासाठी आराखडा तयार करावा लागतो. हीच बाब संशोधनालाही लागू पडते प्रत्येक संशोधन विषयाला संशोधनात विषेश महत्त्व आहे. कललिंगर यांच्या मते, संशोधन आराखडा म्हणजे संशोधनाची एक योजना संरचना आणि एक रणनिती आहे. ज्याद्वारे संशोधन प्रश्नांची उत्तरे प्राप्त केली जातात आणि भिन्न तत्व प्रसरणावर नियंत्रण ठेवले जाते. पूर्व नियोजन हा संशोधनाचा आत्मा आहे. प्रत्यक्ष

संशोधनाला सुरूवात करण्यापूर्वी पूर्व नियोजन केले जाते म्हणजेच संशोधनाचा आराखडा तयार केला जातो. प्रस्तुत संशोधनासाठी असाच आराखडा तयार करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

संशोधनात संशोधन विषयाची व्याप्ती निश्चित केल्यास तथ्य संकलन कार्याला व प्रकटीकरणाला मदत होत असते. त्यामुळे संशोधन कार्य दिशाहीन होत नाही विशेषतः बाहय संशोधन कार्याला आळा बसतो. म्हणून संशोधकाने संशोधनाची व्याप्ती निश्चित केली आहे. 'दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणात महाराष्ट्र शासनाच्या योजनाचे योगदान' : एक समाजशास्त्रीय विश्लेषण या संशोधन विषयात संशोधकाने महाराष्ट्रातील जिल्हयाची निवड केली आहे. विशेषतः मराठवाड्यातील जिल्हयाचा समावेश केला आहे. प्रस्तुत संशोधनात केवळ दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणाच्या सद्यस्थितीचा व शासकीय योजनाच्या अडचणीचा विचार करण्यात येणार आहे.

संशोधनात संशोधनाच्या व्याप्ती बरोबरच संशोधन विषयाला काही मर्यादा असणार आहे संशोधक हा संशोधन विषया संदर्भात राष्ट्रीय स्तरावर संशोधन करू शकणार नाही आणि करावयाचे म्हटले तरी ते शक्य होणार नाही म्हणून संशोधकाचे संशोधन विषयाचे अध्ययन क्षेत्र फक्त मराठवाड्यातील दिव्यांग व्क्तीना मिळणाऱ्या योजनेपर्यंतच मर्यादित आहे. संशोधकाच्या संशोधनातून काढण्यात येणारे निष्कर्ष महाराष्ट्र व मराठवाड्यातील दिव्यांग व्यक्तीला मिळणाऱ्या योजनेसंदर्भात राहणार आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

दिव्यांग ही वैयक्तिक समस्या असली तरी ती एक प्रमुख सामाजिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील समस्या आहे. दिव्यांगत्व म्हणजे सामान्य स्थितीतील कोणत्याही मनुष्याला पार पाडता येणाऱ्या कृती किंवा त्यांच्या अवक्यातील कृती पार पाडण्यावरील कोणतेही निर्बंध वा क्षमतेचा अभाव होय.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अहवालानुसार जगातील लोकसंख्येच्या सुमारे १०% लोक दिव्यांग आहेत. म्हणजेच सर्व जगामध्ये सुमारे ६० कोटी लोक किंवा नागरिक हे दिव्यांग असलेले दिसून येतात. दिव्यांगत्वामुळे निर्माण होणाऱ्या समसया त्या व्यक्ती पुरत्याच मर्यादित नसतात तर त्या सामाजिक स्वरूपाशी देखील निगडित असतात.

दिव्यांग व्यक्तींना वैयक्तिक व सामाजिक दृष्टिकोनातून शासनाने दिलेल्या शासन निर्णय किंवा परिपत्रक १९९५ च्या कायद्यानुसार अनेक सुविधा उपलब्ध करून देणे व त्यांची अंमजबजावणी होण्यासाठी अनेक यंत्रणा कार्यरत केल्या आहेत. त्यामध्ये प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी दिव्यांग व्यक्तीकरिता कार्य करण्यासाठी दिव्यांग व्यक्तीच्या समस्याचा शोध घेऊन त्यावर उपाय-योजना करण्यासाठी तसेच त्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी शासकीय योजना राबविते. त्या योजनाचा दिव्यांग व्यक्तींना उपयोग होतो का हे संशोधनातून शोधावयाचे आहे.

दिव्यांग व्यक्तींसाठी ज्या योजना राबविल्या जातात त्यांच्या लाभापासून दिव्यांग व्यक्ती वंचित राहत असलेला संशोधनातून स्पष्ट करावयाचे आहे. दिव्यांग व्यक्तींना पाहिजे तेवढया प्रमाणात योजनेचा लाभ होत नसल्यामुळे यावर संशोधन करणे महत्त्वाचे आहे. दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी बनविण्यासाठी समाजामध्ये त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी अजुन कोण-कोणत्या सोयी सुविधांची गरज आहे. यांची माहिती संशोधनातून स्पष्ट करता येते.

दिव्यांगासाठी शासनाच्या अनेक योजना कार्यरत असल्या तरी त्यांचा लाभ दिव्यांग व्यक्तींना मिळतोच असे नाही कधी-कधी आवश्यक कागदपत्रे मिळविण्यासाठी करावी लागणारी दगदग तर कधी योजनाविषयी योग्य माहिती नसणे यासारख्या कारणांमुळे खास करून ग्रामीण भागातील जनता या योजनेच्या लाभापासून वंचित राहताना दिसते हे संशोधनातून लक्षात आणून द्यावयाचे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी संशोधनाची उद्दिष्टे निश्चित करावी लागतात. महाराष्ट्र शासनाने दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणासाठी ज्या योजना राबविल्या आहेत त्यावर आधारित काही उद्दिष्टे निश्चित केली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत.

१. दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी पोषक वातावरण निर्मिती करणे.

२. दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणार्थ राबविलेल्या योजनाचे मूल्यमापन करणे.

३. आधुनिक काळात दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणाची गरज लक्षात आणून देणे.

४. योजनेच्या लाभापासून वंचित असणाऱ्या दिव्यांग व्यक्तीसाठी उपाय-योजना सुचविणे.

५. दिव्यांग व्यक्तीच्या सामाजिक व आर्थिक जीवनाचा आढावा घेणे.

६. दिव्यांग व्यक्तीचा सामाजिक आर्थिक दर्जा तपासणे.

संशोधनाची गृहितके :

संशोधन करण्यासाठी गृहितके मांडणे आवश्यक ठरते. गृहितके मांडल्याशिवाय संशोधन कार्य करणे कठीण आहे. गृहितके संशोधनाला दिशा दाखविण्याचे कार्य करतात म्हणून संशोधनात संशोधन कार्य व्यवस्थित पार पाडण्यासाठी गृहितके आवश्यक ठरतात त्यानुसार दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणात महाराष्ट्र शासनाच्या योजनाचे योगदान या संशोधन कार्यासाठी पुढीलप्रमाणे गृहितके मांडली आहेत.

१. देशाच्या विकासात दिव्यांगाचे सक्षमीकरण होणे महत्वाचे ठरते.

२. शासकीय योजना राबविल्यामुळे दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणाला हातभार लागला आहे.

३. दिव्यांगाच्या सर्वांगिण विकासासाठी शासकीय योजनाची प्राथमिक गरज आहे.

४. दिव्यांग व्यक्तींना शासकीय सोयी व भौतिक सुविधा आर्थिक मदत वेळेवर मिळत नाहीत.

५. दिव्यांग व्यक्तीना आर्थिक व स्वंयरोजगाराचे साधन प्राप्त झाले आहे.

६. दिव्यांग व्यक्तीचा सामाजिक व आर्थिक दर्जा सुधारलेला आहे.

संशोधनाचे क्षेत्र :

संशोधनाची समस्या निश्‍चित झाल्यानंतर ते अध्ययन कोणत्या भौगोलिक क्षेत्रात करावयाचे किंवा अध्ययन क्षेत्र कोणते असणार हे ठरविणे गरजेचे असते. त्याशिवाय अध्ययन क्षेत्र निश्‍चित होणार नाही. म्हणून सामाजिक क्षेत्रात संशोधन करीत असताना प्रत्येक संशोधकाला संशोधनाचे क्षेत्र निश्‍चित करावे लागते. संशोधन क्षेत्र ठरविल्यामुळे तथ्य संकलनाला संशोधन कार्याला निश्‍चित दिशा प्राप्त होते. संशोधन कार्य वेळेत पूर्ण होण्यासाठी संशोधन क्षेत्र ठरविल्यामुळे तथ्य संकलनाला संशोधन कार्याला निश्‍चित दिशा प्राप्त होते संशोधन कार्य वेळेत पूर्ण होण्यासाठी संशोधन क्षेत्र निश्‍चित केल्याने मदत प्राप्त होते. तसेच निवडलेल्या संशोधन विषयाला योग्य तो न्याय देता येतो.

अशा प्रकारे संशोधन क्षेत्र निश्‍चित करण्याला अतिशय महत्त्व असलेले दिसून येते. प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी महाराष्ट्र राज्यातील जिल्हयाची निवड केली आहे. दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणात महाराष्ट्र शासनाच्या योजनाचे योगदान हया विषयाची निवड केली. मराठवाडा प्रांतातील जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे.

संशोधन क्षेत्राची ओळख :

महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण ३७ जिल्हयाचा समावेश होतो महाराष्ट्राची सहा प्रशासकीय विभागात विभागणी झालेली आहे. तसेच प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी दिव्यांग व्यक्तीसाठी दिव्यांग आयुक्तालयाची स्थापना केली आहे. मराठवाड्याचा विचार केला असता मराठवाडा मुक्ती संग्रामांसाठी प्रसिद्ध आहे. यात कार्यरत असणारे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नावावरून

नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ स्थापन केले आहे. म्हणून मराठवाड्याची वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

नमुना निवड :

संशोधनासाठी जो विषय निवडलेला असतो त्या विषयासंबंधी संपूर्ण विश्व किंवा समग्राचे अध्ययन करणे संशोधन कर्त्याला शक्य नसते म्हणून समग्राच्या प्रतिनिधिक एककाची निवड करून त्याचेच अध्ययन केले जाते. नमुना निवड या तंत्रामुळे संशोधनात वेळ, पैसा, श्रम यांची बचत होते. तसेच संपूर्ण अध्ययनाचे निष्कर्ष व नमुना तंत्राद्वारे केलेल्या संशोधन अध्ययनाच्या निष्कर्षात तफावत नसते. नमुना निवड तंत्राच्या या उपयोगामुळे प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड तंत्रातील दुय्यम तथ्य संकलन प्रकारातील साहित्य, संदर्भ ग्रंथ मासिके, वर्तमानपत्रे यांचा वापर करून उत्तरदात्याची निवड करण्यात येणार आहे. दुय्यम तथ्या सोबत प्राथमिक तथ्य प्राप्त करण्यासाठी महाराष्ट्रातील दिव्यांग असणाऱ्या व्यक्तीचा नमुना निवड प्रकाराचा आधार घेवून निवड करणार आहे. या दिव्यांग असणाऱ्या व्यक्तीची संख्या २०० असणार आहे.

तथ्य संकलनाचे तंत्रे :

सामाजिक संशोधनामध्ये तथ्य संकलनाला अनन्य साधारण असे महत्त्व आहे. कारण संशोधन कार्याची सुरूवात आणि संशोधन कार्याचा समारोप हा सुध्दा तथ्यांच्या आधारानेच होत असतो. संशोधक तथ्य सामग्रीला आपल्या अध्ययनाचा आध्णार मानुन कार्यपूर्ण करतो. त्याशिवाय संशोधन कार्य पूर्ण होत नाही. म्हणून तथ्यांचे संकलन शास्त्रीय पद्धतीने करणे आवश्यक असते. तथ्य संकलनाकरिता प्राथमिक स्त्रोतातील सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. कारण काही दिव्यांग व्यक्ती ह्या अंध तसेच अशिक्षित आहेत. तसेच द्वितीय स्त्रोतासाठी ग्रंथ, मासिक, विशेषांक, वर्तमानपत्र, शोधप्रबंध इत्यादी आवश्यक तथ्य सामग्रीचे संकलन करण्यात येणार आहे. प्राथमिक स्त्रोतासाठी मुलाखत अनुसूचिचा अवलंब करण्यात येणार आहे.

तथ्यांचे वर्गीकरण व आशय विश्लेषण :

तथ्यांचे संकलन केल्यानंतर तथ्यांचे संपादन, तथ्यांचे साम्य व भेदाच्या आधारे वर्गीकरण, सांकेतिकरण हे महत्त्वाचे टप्पे पार पाडल्यानंतर प्राप्त माहितीच्या तथ्यात रूपांतर करणे हा आशय विश्लेषणाचा उद्देश आहे. त्यामुळे ती तथ्य वैज्ञानिक पद्धतीने उपयोगात आणून निष्कर्ष काढता येतात. विश्लेषणासाठी आशय विश्लेषण तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

निष्कर्ष व शिफारशी :

संशोधनात प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे विषयांचे उद्देश व गृहितकृत्ये तपासून योग्य ते निष्कर्ष काढून आवश्यक त्या सुचना करण्यात येणार आहेत.

प्रकरणाची रचना :

प्रकरण पहिले	:	प्रस्तावना
प्रकरण दुसरे	:	संशोधन पद्धती
प्रकरण तिसरे	:	दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणात महाराष्ट्र शासनाच्या योजनाविषयी माहिती
प्रकरण चवथे	:	दिव्यांग सक्षमीकरणात महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचे योगदान (विशेष संदर्भासह)
प्रकरण पाचवे	:	निष्कर्ष व शिफारशी

संदर्भग्रंथ सूची

१. सामाजिक संशोधन पद्धती	:	प्रदिप आगलावे
२. सामाजिक संशोधन	:	बोधनकर
३. वाटचाल सामाजिक न्यायाच्या दिशेने सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग	:	महाराष्ट्र शासन संचलनालय
४. अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५		
५. महाराष्ट्र शासन अपंग कल्याण कृती आराखडा २०११		अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे
६. मानवी हक्क		तुकाराम जाणव आणि महेश शिरापूरकर

संशोधक

कु. कवडे बेबी माधवराव

बी.एड., एम.ए. सेट (समाजशास्त्र)

सामजिकशास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक

डॉ. शेंडे के.सी.

सहयोगी प्राध्यापक

समाजशास्त्र विभाग

पीपल्स कॉलेज, नांदेड